# वारंवार विचारण्यात येणारे प्रश्न

- **ई रजिस्ट्रेशन अंतर्गत नोंदणी करण्यासाठी कंत्राटदाराच्या कोणत्या विविध प्रकारच्या वर्गवारी उपलब्ध आहेत ?**

    - स्थापत्य कंत्राटदार, सर्व वर्ग ४ पासून ते वर्ग ९ पर्यंत, नविन नोंदणी, नुतनीकरण, श्रेणीवाढसाठी
    - इंटेरिअर डेकोरेटर, मॉड्युलर फर्निचर - सर्व वर्ग, नविन नोंदणी, नुतनीकरण, श्रेणीवाढीसाठी
    - वास्तुशास्त्रज्ञ
    - सेवानिवृत्त अभियंते
    - बांधकाम पर्यवेक्षक
    - सुशिक्षित बेरोजगार अभियंता
    - मजुर सहकारी संस्था

- **केवायसी म्हणजे काय व ई-रजिस्ट्रेशन आज्ञावलीमध्ये त्याचे असलेले महत्व ?**

    केवायसी म्हणजे आपल्या कंपनीबाबतची माहीती. हे फार महत्वाचे दस्तऐवज आहे. केवायसी अंतर्गत अर्जदाराचे नाव पत्ता सेव्ह करून प्रमाणपत्रावर दाखविल्या जातात व जे बदलविता येऊ शकत नाही.

- **केवायसी मध्ये एडिट सुविधा आहे का ?**

    केवायसी सेव्ह केल्यानंतर अर्जदार केवायसीविषयक उद्धृत केलेली माहिती बघू शकतो व त्यामध्ये एडिट करु शकतो. मात्र केवायसी सेव्ह केल्यानंतर आणि भुगतान केल्यानंतर, अर्जदार अथवा विभागास केवायसी मध्ये बदल करता येऊ शकत नाही.

- **केवायसी मध्ये पत्त्याचे काय महत्व आहे ?**

  केवायसी पिन-कोडसह अचूक पत्ता असणे आवश्यक आहे जेणकरून विभागास पडताळणी करणे आणि अर्जदारासमवेत संपर्क साधता येईल.

- **नियम, प्रक्रिया व आवश्यक दस्तऐवज इ. बाबतची माहिती कोण पुरविणार ?**

  संबंधित विभागीय कार्यालयातील नोंदणीविषयक काम करणारे कर्मचारी, अधिकारी नोंदणीसाठी असलेले नियम, त्याची प्रक्रिया व आवश्यक दस्तऐवज इ. बाबतची सर्व माहिती उपलब्ध करून देतील. सबंधित विभागीय कार्यायलयांचे संपर्क विवरण "contact page" मध्ये उद्धृत केलेले आहे.

- **कंत्राटदाराचे ई-नोंदणीसाठी ई-मेल आयडी चे महत्व काय आहे ?**

  अर्जदाराचा ई-मेल आयडी हा आज्ञावलीमध्ये जतन करुन ठेवल्या जातो. नोंदणी प्रक्रियेची सद्यःस्थिती कंत्राटदाराच्या सदर ई-मेल आयडीद्वारे ई-मेलद्वारे कळविण्यात येते.

- **ई-मेलचे कार्यान्वयन म्हणजे काय ?**

  उपभोक्ता जेंव्हा स्वतःच्या ई-मेल आयडीवरून आज्ञावलीमध्ये क्रियाशील होतो, त्यावेळी सिस्टीम जनरेटेड ई-मेल त्याच्या ई-मेल आयडीवर पाठविण्यात येतो. सदर ई-मेल हा कार्यान्वयनासाठी तपासून घेणे व ई-मेलचा पत्ता बरोबर आहे, याची खात्री करून घेण्यासाठी गरजेचा आहे. सुरक्षेच्या कारणास्तव ई-मेलचे कार्यान्वयन फार महत्वाचे आहे, कारण सर्व प्रकारचा संवाद हा ई-मेल वरच विसंबून आहे.

- **आज्ञावली दस्तऐवज अपलोड करण्याची कमाल मर्यादा काय आहे ?**

  कोणताही दस्तऐवज आज्ञावालीमध्ये अपलोड करण्याची कमाल मर्यादा २.० एमबी आहे.

- **नेमणुकीची तारीख दिसली नाही ?**

लॉगीनमध्ये नेमणुकीची तारीख आढळून न आल्यास, संबंधित समितीच्या कार्यालयाशी संपर्क साधावा. सर्व समित्यांचे संपर्क विवरण “contact page” मध्ये उद्धृत केलेले आहे.

- **नोंदणी शुल्काचे भुगतान कधी करावे ?**

मान्यता प्रदान करणा-या अधिका-याकडून नोंदणी अर्ज मंजूर झाल्यानतंर सिस्टीमद्वारेच संबंधित अर्जदारास नोंदणी शुल्काचे भुगतान ऑनलाईन करण्यास्तव ई-मेल पाठविण्यात येतो. अर्जदारास हा ई-मेल प्राप्त झाल्यानंतर त्याने स्वतःच्या आयडीवर कृपया लॉगीन करावे व नोंदणी शुल्काचे भुगतान करावे. जर ई-मेल प्राप्त झाला नसल्यास कृपया संबंधित विभागीय कार्यालयांस संपर्क करावा. संबंधित विभागीय कार्यालयांचे संपर्क विवरण “contact page” मध्ये उद्धृत केलेले आहे.

- **ई-रजिस्ट्रेशन आज्ञावलीमध्ये ऑनलाईन पेमेंटची सुविधा उपलब्ध आहे का ?**

ई-रजिस्ट्रेशन आज्ञावलीमध्ये क्रेडीट कार्ड, डेबीट कार्ड, नेटबँकींग इ. माध्यमातून भुगतान करण्याच्या सुविधा सद्यःस्थितीत उपलब्ध आहेत.

- **ऑनलाईन पेमेंट करतांना अडचण उद्‌भवल्यास संपर्क कुठे करावा ?**

ऑनलाईन पेमेंट करतांना अडचण उद्‌भवल्यास कृपया आज्ञावलीमध्ये असलेले विवरण “contact us” पान तपासावे. सदर पानामध्ये दूरध्वनी क्र., ई-मेल आयडी इ. बाबी विस्तृतणे उपलब्ध आहेत. जर ऑनलाईन पेमेंट केले आणि खात्यामधुन पैसे वजा झालेत तथापि रसीद प्राप्त झाली नसल्यास पुनःश्च भुगतान करू नये. अशा परिस्थितीत Bank Statement सह Help Desk शी ई-मेल द्वारे संपर्क साधावा.

- **नोंदणी प्रमाणपत्राची प्रत कशी प्राप्त करावी ?**

  नोंदणी शुल्काचे भुगतान केल्यानंतर संबंधित सा.बां. विभागाचे नोंदणी अधिकारी System Generated प्रमाणपत्र त्यांच्या लॉगीनमध्ये तयार करतील. तद्नंतर सदर प्रमाणपत्र हे अर्जदाराच्या लॉगीनमध्ये उपलब्ध असेल. कृपया नोंद घ्यावी की, आपल्याला लॉगीन करून **Print Certificate** ला Click करावे मग PAN No. टाकावा त्यानंतर सदर प्रमाणपत्राची पिंट घेता येईल.

- **सदर सेवा महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम मध्ये अंतर्भुत आहे का ?**

  हो. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम अन्वये सा.बां. विभाग ई-रजिस्ट्रेशन बाबत सेवा देण्याकरीता कटीबद्ध आहे.

- **Help Desk शी संपर्क कधी साधावा ?**

  Help Desk हे उपरोक्त आज्ञावली तसेच Web शी संबंधित हाताळत/न्याहाळत असतात. सर्व शासकीय कामकाजाच्या दिवशी सकाळी ११.०० ते संध्याकाळी ५.३० वाजेपर्यंत Help Desk शी संपर्क साधु शकतात.

  नोंदणीसाठी असलेले नियम, त्याची प्रक्रिया, प्रकरणाचा सद्यःस्थिती, दस्तऐवजांची यादी, वार्षिक उलाढाल, पतदारी इ. बाबतकरीता सबंधित विभागीय कार्यालयांस संपर्क करावा. संबंधित विभागीय कार्यालयांचे संपर्क विवरण "contact page" मध्ये उद्धृत केलेले आहे.

**इतर कुठल्याही संबंधित माहितीसाठी,कृपया आम्हास itccnagpur@gmail.com या ई-मेल पत्त्यावर ई-मेल करावा.**

**हा दस्तऐवज सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांची मिळकत आहे आणि महाराष्ट्र शासनाकरीता इलेक्ट्रॉनिक नोंदणीकरण सिस्टीमअंतर्गत कंत्राटदाराच्या नोंदणीकरिता फक्त संदर्भाच्या हेतुने उपभोक्ताद्वारे उपयोग केला जावा.**